## संक्षिप्त वृत्त



राज्यस्तरीय जिजाऊ आदर्श माता पुरस्कार सुनंदा चंदनशिवे यांना प्रदान करण्यात आला.

### जिजाऊ आदर्श माता पुरस्कार सुनंदा चंदनशिवे यांना प्रदान

**पंढरपूर** : येथील सुनंदा चंदनशिवे यांना विश्व भूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानच्यावतीने राज्यस्तरीय माँ जिजाऊ आदर्श माता पुरस्कार देण्यात आला. कौटुंबिक संस्कार-मुल्ये जपून, तीनही मुलांना उच्च शिक्षण देण्याची जबाबदारी पार पाडल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. खा. अमर साबळे, माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, विठ्ठल एज्युकेशन सोसायटीचे बी. पी. रोंगे, दिलीप धोत्रे, प्रभाकर देशमुख, डी. राज सर्वगोड यांच्या हस्ते प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह, संविधान प्रत त्यांना सन्मानित करण्यात आले. निवडीबद्दल आ. प्रशांत परिचारक, भगिरथ भालके, अभिजीत पाटील, दिलीप घाडगे, उद्योजक राजू खरे, नगराध्यक्ष नागेश भोसले, वामन बंदपट्टे, संजय निंबाळकर, साधना उगले, भगवान मुळे, सुधाकर पिसे, संतोष पवार, लखन चौगुले आदींनी अभिनंदन केले.




अकलूज बाजारात स्वीप अंतर्गत जनजागृती मतदान जागृती अभियान राबविण्यात आली.

### अकलूज बाजारात 'स्वीप' अंतर्गत जनजागृती अभियान

**अकलूज** : लोकसभा निवडणूक २०२४ अनुषंगाने अकलूज येथील सोमवार (दि.१५) बाजारात एसव्हीइपी (स्वीप) कार्यक्रमांतर्गत सेल्फी पॉईंट तयार केला होता. यामार्फत मतदान जागृती करण्यात आली.अकलूज बाजारात माढा लोकसभा मतदारसंघातील विविध गावातून शेतकरी,व्यापारी येत असतात. त्याच अनुषंगाने सोमवारी स्वीप नोडल अधिकारी यांचे पथकामार्फत मतदार जनजागृती अभियान सेल्फी पॉईंट तयार करून राबविण्यात आले. उपक्रमामध्ये नागरिकांनी उस्फूर्तपणे गर्दी केली होती. नागरिकांनी स्वतःहून आपापल्या भागात मतदान करणार आणि आपल्या शेजारील परिसरातील मतदारांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करणार असे सांगितले. माळशिरस भागातील मतदान दि. ७ मे रोजी असून आम्ही सर्व मतदार आपला पवित्र मतदानाचा हक्क बजावणार आहे, अशी शपथ सर्व नागरिक व व्यापाऱ्यांनी घेतली.




कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी अभियांत्रिकी महाविद्यालयात मॉक सराव परीक्षेचे उद्घाटन प्रा. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

### केआयटीमध्ये मोफत मॉक एमएचटी-सीईटीचे उद्घाटन

**पंढरपूर** : श्री पांडुरंग प्रतिष्ठान पंढरपूर संचलित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी अभियांत्रिकी महाविद्यालयात मोफत मॉक एमएचटी-सीईटीच्या सराव परीक्षेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य एस.पी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.मुलांना प्रत्यक्ष कॉम्प्युटरवर सीईटी परीक्षा कशी द्यायची याचे प्रात्यक्षिक देण्यात आले. महाविद्यालयाचे प्रवेशप्रक्रियाप्रमुख डॉ अभय उत्पात यांनी मुख्य परीक्षेवेळी मुलांच्या मनात गोंधळ होऊ नये व त्यांची प्रॅक्टिस होण्याच्या उद्देशातून कर्मयोगी कॉलेजने या मोफत मॉकटेस्टचा उपक्रम राबवल्याचे सांगितले. एकूण १० प्रॅक्टिस टेस्टचे आयोजन असून येथून पुढील नऊ टेस्ट या ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येतील. परिक्षा यशस्वी करण्यासाठी प्रा. आर जे भोसले व डी एम चौगुले यांचे विशेष सहकार्य लाभले. पांडुरंग प्रतिष्ठानचे चेअरमन रोहन परिचारक यांनी उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील, डॉ. ए. बी. कणसे, रजिस्ट्रार जी. डी. वाळके, प्रा. जे. एल. मूडेगावकर, ए. टी. बाबर आदी उपस्थित होते.

### बालनाट्य शिबिराचा आज समारोप

**सोलापूर** : बालरंगभूमी परिषद, सोलापूर शाखेच्या वतीने आयोजित बालनाट्य अभिनय प्रशिक्षण शिबिराचा समारोप बुधवार दि. १७ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृह, सोलापूर येथे होणार आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार, माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप, नाट्य परिषद मुंबईचे सहकारी दिलीप कोरके, सोशल महाविद्यालयाचे प्राचार्य ई. जा. तांबोळी, नाट्यपरिषद नियामक मंडळाचे सदस्य विश्वनाथ आवड आणि सुमित फुलमामडी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.
दुपारी ४-३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिरापासून हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर पर्यंत बालनाट्य शिबिरातील सहभागी विद्यार्थ्यांची शोभायात्रा काढली जाणार आहे, असे बालरंगभूमी परिषद सोलापूर शाखेचे अध्यक्ष सीमा यलगुलवार यांनी सांगितले.

# रेशनधारकांना 'ई-पॉज' ओळखेना

## मशीनवर बोटाचे ठसे उमटत नसल्याने धान्यापासून वंचित

- दुकानदार, कार्डधारकांत वारंवार वाद
- जुनाट २ जी मशीनमुळे समस्या
- कुटुंबातील अन्य व्यक्तींना आणून ठसे घेण्याची वेळ

चिखली/हनुमंत चौधरी

**मोहोळ तालुक्यातील कार्डधारकांना रेशन दुकानातून धान्य घेताना बोटाचे ठसे ई-पॉज मशीनवर उमटत नाहीत. परिणामी धान्य न घेता रेशन दुकानातून रिकाम्या हातांनी परत यावे लागते. मात्र, यावरुन रेशन दुकानदार आणि कार्डधारकांमध्ये सतत तू-तू मैं-मैं होत आहे.**

### 'आय स्कॅनर गन' उपलब्ध करुन द्यावे

शासनाने आता धान्य वितरण व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी 'आय स्कॅनर गन' हा पर्याय आणला आहे. त्यामुळे लाभार्थ्यांच्या बोटाचे ठसे नसले तरी 'आय स्कॅनर'ने व्यक्तीला धान्य पटकन् मिळणार आहे. त्यामुळे पुरवठा विभागाने लवकरात लवकर शासन स्तरावर पाठपुरावा करून तालुक्यातील प्रत्येक रेशन दुकानदार यांना नवीन मशीन उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावा, अशी मागणी कार्डधारकांमधून करण्यात येत आहे.

### तांत्रिक त्रुटींमुळे अडचणी येत आहेत

सार्वजनिक वितरण व्यवस्थांतर्गत रास्त भाव दुकानदारमार्फत टू जी ई-पॉज मशीनद्वारे धान्यवितरण होत आहे. परंतु या मशीन जुन्या झाल्या असून तांत्रिक त्रुटींमुळे अडचणी येत आहेत. शासन स्तरावरून नवीन फोर जी ई-पॉज मशीन देण्यात येणार असून त्यामध्ये स्कॅनर गन हा पर्याय उपलब्ध आहे. लवकरच या मशीन्स दिल्या जाणार असून वितरणातील अडचणी दूर होतील.

**- महालिंग लोंढे,**
पुरवठा निरीक्षक, मोहोळ तालुका.



पुरवठा विभागाने यामध्ये लक्ष घालून रेशन दुकानदारांना नवीन मशीन उपलब्ध करून दिल्या तर रेशन दुकानदार आणि लाभार्थी यांच्यामध्ये वादाचे प्रसंग निर्माण होणार नाहीत. शिवाय रेशनही वेळेवर मिळून वितरण व्यवस्थाही सुलभ होईल, अशी भावना मोहोळ तालुक्यातील लाभार्थ्यांमधून व्यक्त केली जात आहे.

रेशन धान्य वितरणात पारदर्शकता येण्यासाठी शासनाने ई-पॉज यंत्रणा कार्यान्वित केली. यामध्ये व्यक्तिच्या बोटांचे ठसे घेऊन धान्य दिले जाते.

मात्र, काही जणांच्या बोटांवरील रेषा पुसट असतात. त्यामुळे ई-पॉज मशीनवर त्यांचे ठसे उमटत नाहीत. मग त्यांना कुटुंबातील अन्य व्यक्तींना आणून ठसे देऊन धान्य घ्यावे लागते. मोहोळ तालुक्यात ११८ स्वस्त धान्य दुकानदारांकडे टू जी ई-पॉज मशीन आहे. तालुक्यात अंत्योदय २ हजार ९४८ तर प्राधान्य कुटुंब योजनेतील २७ हजार ८४२ अशी एकूण ३० हजार ७९० कार्डधारकांना स्वस्त धान्य दुकानातून धान्य वितरण होते. मात्र, रेशन दुकानदारांना जुन्या टूजी ई-पॉज मशीनमधील तांत्रिक त्रुटींमुळे धान्य देता येत नाही. यामुळे वारंवार लाभार्थी आणि रेशन दुकानदार यांच्यामध्ये वादाचे प्रसंग उद्‌भवतात.



खानापूर येथील संगय्या स्वामी यांच्या जळीत घराची पाहणी करताना एम के फाउंडेशनचे अध्यक्ष महादेव कोगनुरे व ग्रामस्थ.

# घर जळीतग्रस्ताला कोगनुरे यांची भेट

## एम. के. फाउंडेशनचे कार्यकर्ते संकटग्रस्तांच्या मदतीला

द. सोलापूर/प्रतिनिधी

खानापूर (ता. दक्षिण सोलापूर) येथील संगय्या स्वामी यांचे घर मंगळवारी (दि.१६) पहाटे भीषण आगीत जळून खाक झाले. याची माहिती कळताच एम. के. फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांना त्यांना भेट देऊन सांत्वन केले.

कुटुंबियांनी वेळीच सतर्कता बाळगल्याने जीवितहानी झाली नाही. संपूर्ण घरच आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने संगय्या स्वामी यांचा संपूर्ण संसार उघड्यावर पडला होता. स्वामी यांना शासनाने मदत देण्याची मागणी होत होती. मात्र, शासनाची मदत पोहोचण्यापूर्वी महादेव कोगनुरे व त्यांच्या फौजफाटा दुर्घटनास्थळी हजर होऊन मदतीचा हात देतो. यावेळीही कोगनुरे यांनी दुर्घटनास्थळी त्वरित भेट देऊन माणूसकी दाखवल्याने कौतुक होत आहे.

अनेक वर्षांपासून संगय्या स्वामी हे मंदिरात पुजारी म्हणून सेवा बजावत होते. याच भागात त्यांचे कुटुंब वास्तव्यास होते. मंगळवारी पहाटे संगय्या स्वामी मंदिरात पुजेसाठी गेले असता अचानक घरामध्ये आगीने भडका घेऊन संपूर्ण घर जळून खाक झाले. आगीने भडका घेतल्याचे पाहून कोणीच घरात प्रवेश केला नाही. पाणीटंचाई असल्याने आग नियंत्रणात आणण्यासाठी वेळेवर पाणी उपलब्ध न झाले नाही.

परिणामी संपूर्ण घर जळून खाक होऊन संपूर्ण संसार उघड्यावर पडला. स्वामी व त्यांच्या कुटुंबीयाजवळ अंगावरील कपड्याशिवाय काहीच शिल्लक उरले नव्हते. यावेळी महादेव कोगनुरे व त्यांच्या कार्यकर्त्यांनी मदतीचा हात दिला.

# पळवून नेलेल्या अल्पवयीन मुलीचा शोध

## अनैतिक मानवी प्रतिबंधक कक्षाची कामगिरी

सोलापूर/प्रतिनिधी

फौजदार चावडी पोलीस ठाणे हद्दीतील अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवणाऱ्या परराज्यातील आरोपीला अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष पोलिसांनी अटक करून मुलीचा शोध घेतला आहे. राज दिपचंद कश्यप (संजयनगर, सुरत गुजरात) असे आरोपीचे नाव आहे.

गेल्या दहा महिन्यापूर्वी अल्पवयीन मुलीला कशाचे तरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याबाबत फौजदार चावडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला होता. वरील मुलींचा शोध होत नसल्याने हा गुन्हा अनैतिक मानवी प्रतिबंधक कक्षाकडे वर्ग केला होता.

तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक अश्विनी काळे यांनी सायबर पोलीस ठाण्याच्या मदतीने मोबाईलचे लोकेशन काढून दि. १३ एप्रिल रोजी संजयनगर, निलगिरी, सुरत, गुजरात येथून आरोपी राज कश्यप व अल्पवयीन मुलीला ताब्यात घेतले. पुढील कारवाईसाठी फौजदार चावडी पोलिसांच्या ताब्यात दिले. याबाबत पोलीस उपनिरीक्षक जेऊघाले तपास करीत आहेत.

ही विशेष कामगिरी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त गुन्हे दीपाली काळे,सहायक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे, पोलीस निरीक्षक महादेव राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अश्विनी काळे, राजेंद्र बंडगर, अलका शिपुरे, सत्तार पटेल, दादा गोरे तसेच सायबर विभागाचे अविनाश पाटील, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली आहे.


## मतदानासाठी ओळखीचे १२ पुरावे ग्राह्य

### उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी यांची माहिती

सोलापूर/प्रतिनिधी

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लोकसभा निवडणुकीसाठी मतदान करताना मतदार ओळखपत्राबरोबरच छायाचित्र असलेले १२ पुरावे ग्राह्य धरले जातील, असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी सांगितले.

आधारकार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक/पोस्ट ऑफिसने जारी केलेल्या छायाचित्रासह पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅनकार्ड, रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया यांच्या व्दारा नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, फोटोसह पेन्शन दस्तऐवज, केंद्र/राज्य सरकार/सार्वजनिक उपक्रम/ पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना जारी केलेले ओळखपत्र, खासदार/आमदारांना जारी केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने जारी केलेले विशेष विकलांगता प्रमाणपत्र, प्रवासी भारतीय मतदारांसाठी त्यांचा केवळ मुळ पासपोर्ट आवश्यक राहील, असे निऱ्हाळी यांनी सांगितले.



### मतदार माहिती चिठ्ठी ग्राह्य नाही

ओळखीचा पुरावा म्हणून मतदार माहिती चिठ्ठी ग्राह्य असणार नाही,असेही निऱ्हाळी यांनी सांगितले.

## 'विचार-२४' या स्पर्धेत 'स्वेरी'चे यश

**सोलापूर** : सोलापूर येथील वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी (डब्ल्युआयटी) मध्ये दि. २२ व २३ मार्च रोजी झालेल्या 'विचार-२४' या राष्ट्रीय दर्जाच्या तांत्रिक परिसंवाद स्पर्धेत स्वेरीच्या दोन विद्यार्थ्यांना उत्तुंग यश मिळाले.

दोघांनी आपल्या प्रोजेक्टचे उत्कृष्ट सादरीकरण केले. मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात तृतीय वर्षातील विद्यार्थी सत्यजित गोफणे व द्वितीय वर्षातील विद्यार्थी चैतन्य सोनवणे यांनी 'युनिव्हर्स डिझाईन चॅलेंज' या इव्हेंटमध्ये प्रथम क्रमांक मिळविला.



दोघांनी मिळून इमर्जन्सी रिस्पॉन्स ड्रोनचे मॉडेल बनविले. याद्वारे आपत्कालीन परिस्थितीत ड्रोनच्या साह्याने बचाव कार्य, वैद्यकीय सेवा पुरवठा व थ्रीडी मॅपींग अशी तीन कार्ये एकाच ड्रोनच्या माध्यमातून करण्यासाठी त्यांनी नवीन उपकरण तयार करून दाखविले. प्रकल्पाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. रोख रूपये १२ हजार, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

दोघांना संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे, विभागप्रमुख डॉ. एस. बी. भोसले, प्रा. पी. बी. आसबे तसेच शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेच्यावतीने प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या हस्ते विठ्ठल गोफणे, पल्लवी गोफणे, डॉ. एस. एस. वांगीकर, डी. टी. काशिद आदींच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, स्वेरी अंतर्गत इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी दोघांचे अभिनंदन केले.

# रानमसलेतील शाळेचे 'लक्ष्मी हाइड्रॉलिक्स'कडून पुनरुज्जीवन

## एक कोटीपेक्षा जास्त खर्चून बांधली सुसज्ज इमारत

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर येथील लक्ष्मी हाइड्रॉलिक्स या कंपनीने उत्तर सोलापूर तालुक्यातील रानमसले येथील मराठी शाळेचे पुनरुज्जीवन केले आहे. एक कोटीपेक्षा जास्त रुपये खर्च करून शाळेसाठी नवी सुसज्ज इमारत उभारल्याचे कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक शरद कृष्ण ठाकरे यांनी सांगितले.

रानमसले येथील जिल्हा परिषदेच्या शाळेसाठी बांधलेल्या या सुसज्ज इमारतीचे उद्घाटन दि. २१ रोजी सकाळी साडे आठ वाजता जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या हस्ते होणार आहे. जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. एन. के. ठाकरे अध्यक्षपद भूषविणार आहेत. ज्येष्ठ संपादक संजय आवटे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. लक्ष्मी हाइड्रॉलिक्स प्रायव्हेट लिमिटेडचे टेक्निकल डायरेक्टर आदित्य ठाकरे यांचीही उपस्थिती असणार आहे.

चिंचोळी एमआयडीसीत मुख्यालय असलेली लक्ष्मी हाइड्रॉलिक्स ही भारतातील नामांकित इलेक्ट्रिक मोटर्स बनविणारी कंपनी आहे. चाळीस वर्षांपासून कार्यरत असणारी ही कंपनी वेगवेगळ्या क्षेत्रासाठी लागणाऱ्या इलेक्ट्रिक मोटर्सचे उत्पादन करते. दरवर्षी दोन लाखांपेक्षा अधिक इलेक्ट्रिक मोटर्सचे उत्पादन ही कंपनी करते. कंपनीने कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीसाठीच्या निधीतून आजपर्यंत अनेक समाजोपयोगी कामे केली आहेत.

रानमसले जिल्हा परिषद मराठी शाळेची इमारत मोडकळीस आली होती. त्यामुळे विद्यार्थी या शाळेत येत नव्हते. शाळा बंद पडण्याच्या मार्गावर होती, ही माहिती लक्ष्मी हाइड्रॉलिक्सचे एमडी शरद कृष्ण ठाकरे यांनी वर्तमानपत्रात वाचली. तेव्हा त्यांनी कंपनीच्या खर्चाने सीएसआर उपक्रमांतर्गत शाळेला नवीन इमारत व सुविधा उपलब्ध करून द्यायचे ठरवले. निर्णयानंतर तत्काळ कार्यवाही सुरु करून सात महिन्यातच शाळेची आकर्षक वास्तू उभी राहिली. या काळात शालेय शिक्षण समिती, गावचे सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थांचेही सहकार्य लाभले.




### शहरातील खासगी शाळांच्या तोडीस तोड सोय

इमारतीमध्ये पाच वर्ग खोल्या, कार्यालय, स्वच्छतागृह, संरक्षक भिंत, फर्निचर आणि इतर आवश्यक सुविधा निर्माण करून दिल्या आहेत. शहरातील अत्याधुनिक खाजगी शाळांच्या तोडीस तोड सुविधा येथे निर्माण केल्या आहेत. त्यामुळे या शाळेत शिकणारे २२५ विद्यार्थी, १० शिक्षक व कर्मचारी यांच्यासाठी चांगली सोय झाली आहे. आता ही शाळा कधीच बंद पडणार नाही.

शाळेच्या नव्या इमारतीच्या उद्घाटन समारंभास जिल्हा परिषद , ग्रामपंचायतीचे सर्व पदाधिकारी तसेच शिक्षणप्रेमी नागरिक आणि ग्रामस्थांनी उपस्थित राहावे असे आवाहन लक्ष्मी हाइड्रॉलिक्स प्रा. लि. कंपनीतर्फे केले आहे.